महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/१०३ /२०२४ दि१६/०५/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी, नौपाडा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने** दि. १६/०५/२०२४ रोजी शिवशेना (उबाठा) पक्षाचे मा. खासदार श्री. राजन विचारे साहेब यांचे लोकसभा निवडणूक २०२४ च्या प्रचार सभेकरीता मा. श्री. उध्दव ठाकरे, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. खासदार श्री. शरदचंद्र पवार गडकरी सर्कल येथे उपस्थित राहणार आहेत. सदर आम्रपाली हॉटेल समोर गडकरी सर्कल येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर वेळी शिवसेना (उबाठा), कॉग्रेस पार्टीचे व महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया प्रमाणात सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** १) टॉवर नाका कडून गडकरी सर्कल कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टॉवर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर वाहने जांभळी नाका तसेच स्टेशन रोडने डॉ. मुस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** २) पु. ना. गाडगीळ चौक कडून हॉटेल ग्रीन लिफ येथून डावे वळण घेवून गडकरी सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **हॉटेल ग्रीन लिफ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर वाहने हॅाटेल साईकृपा येथे उजवे वळण घेवून राम मारूती रोड मार्गे किंवा डॉ. मुस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
तसेच सर्व जड वाहने/बसेस अल्मेडा सिग्नल – तीन पेट्रोल पंप – हरिनिवास मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पार्किंग मनाई —** अ) चिंतामणी चौक ते गडकरी सर्कल तलावाची बाजू व सेंट जॉन स्कूलचे पाठीमागील बाजूस रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.
ब) गजानन महाराज चौक ते गोखले रोड पर्यंत राम मारूती रोडवर दोन्ही बाजूस वाहनांना पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.
क) साईकृपा हॉटेल ते SBI कॉर्नर संपूर्ण रोडवर दोन्ही बाजूस वाहनांना पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १६/०५/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा ते २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.

CamScanner